12:57:42 PM

नि. दि. दावा क्र. ३०/२०१८

विनोद वि. देविदास

निशाणी क्र. २७ लगत

## आदेश

निशाणी ४/१ ते ३ येथील दस्त सार्वजनिक स्वरुपाचे असल्यामुळे त्याला **निशाणी क्र.३३ ते ३५** देण्यात येते. निशाण ३२ च्या यादीसोबत दाखल केलेले दस्तऐवजमध्ये महसुलकडील कागदपत्र व खरेदीपत्राच्या सहिच्या शिक्याच्या नकला असल्यामुळे त्याला **निशाण क्र.३६ ते ५५** देण्यात येते.

**वादीतर्फे साक्षीदार क्र.१ यांचा उलटतपास प्रतिवादीतर्फे विधिज्ञ श्री.एन.एम.शेख**

१२. मी उमाजी यांना ओळखतो. ते माझे पणजोबा लागतात. हे खरे आहे की, उमाजीला त्र्यंबक, मनाजी आणि किसन असे ३ मुले आहेत. हे खरे आहे की, ते तिघेही मयत आहेत. हे खरे आहे की, त्र्यंबकच्या मुलाचे नाव नामदेव आहे. हे खरे आहे की, नामदेव मयत असून त्याची पत्नी रुख्मणबाई हयात आहे. हे खरे आहे की, नामदेव आणि रुख्मणबाई यांना ६ मुले आहेत. दिलीप, कारभारी, काशिनाथ, कृष्णा, अशोक असे मुलांचे व मुलीचे नाव निर्मला आहे. हे खरे आहे की, काशिनाथ माझे वडील असून ते मयत झालेले आहे. हे खरे आहे की, काशिनाथची पत्नी आशाबाई आहे. हे खरे आहे की, काशिनाथ व आशाबाई यांना ३ मुलगे आणि १ मुलगी आहे. मनाजीला ३ मुले आहेत. त्यांची नावे शंकर, दत्तु आणि बाबुराव आहे. दत्तु ६ महिन्यापुर्वी मयत झालेला आहे.

१३. हे खरे आहे की, शंकर व बाबुराव मयत आहे. हे खरे आहे की, शंकरची पत्नी जिजाबाई असून ती हयात आहे. हे खरे आहे की, शंकर व जिजाबाई यांना चंद्रकला आणि मंदाबाई या मुली व ताराचंद, बाबासाहेब व पंडीत असे मुलगे आहेत. बाबुरावच्या पत्नीचे नाव काशाबाई आहे. त्यांना २ मुली आहे. त्यांची नावे कुसूमबाई व जानकाबाई आहे. काशाबाई आता मयत आहे. हे खरे आहे की, दत्तुची

पत्नी वारलेली आहे. त्यांच्या पत्नीचे नाव मला सांगता येणार नाही. त्यांना आप्पासाहेब, कैलास आणि विलास असे ३ मुलगे आहेत. दत्तुच्या २ मुलींचे नाव मला सांगता येणार नाही. हे खरे आहे की, किसन मयत असून त्याचा मुलगा कचरु हा देखील मयत आहे. हे खरे आहे की, कचरुची पत्नी रुख्मणबाई देखील मयत आहे. ती मयत होवून १ महिना झालेला आहे. त्यांना २ मुली असून त्यांची नावे सुमित्रा आणि भामाबाई असे आहे.

१४. हे खरे आहे की, मी दावा दाखल करताना दावा मिळकत ही आमची वडिलोपार्जित मिळकत असल्याचे समजून दावा दाखल केला आहे. हे खरे आहे की, मी केवळ आशा, विनोद, जयश्री, रेखा, वैशाली यांच्यासह दावा दाखल केलेला आहे. इतर व्यक्तींना दाव्यात समाविष्ट केलेले नाही. हे खरे आहे की, मिळकत ही वडिलोपार्जित आहे. हे खरे आहे की, दाव्यामध्ये उमाजींच्या सर्व वारसांना पक्षकार करणे गरजेचे होते.

१५. दावा मिळकत आमची आहे याचा निष्कर्ष मी मिळकत माझ्या पणजोबाची असल्यामुळे व सातबारा आमच्या नावे असल्यामुळे काढला. दावा मिळकतीचा गट क्र.१ आहे. त्या गटात माझ्या पणजोबाचे नाव १९५५ ते १९७८ पर्यंत होते. मला हे सांगता येणार नाही की, १९७८ नंतर माझ्या पणजोबा यांच्या नावाचे पुढे काय झाले.

प्रश्न– १९७८ नंतर दावा मिळकतीचे काय झाले तुम्हाला सांगता येणार नाही?

उत्तर– २०१७ पर्यंत माझ्या ताब्यात होती.

प्रश्न– दावा मिळकत २०१७ पर्यंत तुमच्या ताब्यात होती असे दाखवणारा कागदोपत्री पुरावा तुमच्याकडे आहे का?

उत्तर– नाही.

१६. शंकर मनाजी हे माझे चुलत आजोबा होते. त्यांचा या वाद मिळकतीशी सबंध आहे. त्यांच्या वारसांपैकी ताराचंद, बाबासाहेब, पंडीत, त्यांच्या दोन मुली यांना

दाव्यात पक्षकार केलेले आहे. हे खरे आहे की, शंकर हे उमाजीचे नातू असल्यामुळे त्याला पक्षकार केलेले आहे.

प्रश्न– उमाजीचा नातू दत्तू आणि बाबुराव यांना किंवा त्यांच्या वारसांना दाव्यात पक्षकार केलेले नाही?

उत्तर– गट क्र. केवळ ताराचंद, बाबासाहेब, पंडीत या तिघच लोकांच्या नावे असल्यामुळे बाकीच्यांना दाव्यात घेतले नाही.

त्यातील लोकांचे नाव २०१०–११ साली होती. त्यांचे नावाचे सातबारे दाखल केलेले आहे. ताराचंद, बाबासाहेब आणि पंडीत या तिघांनी वाद मिळकत कैलास येलाप्पा गुंडाळे यांना विकली.

१७. हे खरे आहे की, दावा मिळकत १९७८ मध्ये शंकर मनाजीच्या नावे आहे. माझ्या वडीलांनी किंवा माझ्या आजोबांनी शंकर मनाजी याच्या विरुध्द केस केली नाही. हे खरे आहे की, त्यांनी केस का केली नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. शंकर मनाजीच्या नावाने जमीन आल्यानंतर शंकरचे दोन भाऊ दत्तु व बाबुराव किंवा शंकरचे काका त्र्यंबक, किसन यांनी किंवा यांच्या वारसांनी शंकर मनाजीविरुध्द केस दाखल केली नाही. त्याबाबतचा खुलासा दाव्यात लिहलेला नाही.

१८. हे खरे आहे की, त्र्यंबक मनाजी व किसन यांना दावा मिळकती व्यतिरिक्त अन्य मिळकती होत्या. मला त्या मिळकतींचा गट क्रंमाक सांगता येणार नाही. दिलीप नामदेव शिरसाठ हे माझे चुलते आहे. कारभारी हे देखील माझे चुलते आहे. सुनिल हा माझा चुलत भाऊ आहे. शोभाबाई माझी चुलती आहे. अशोक माझे चुलते आहे. शशिकलाबाई माझी चुलती आहे. रुख्माणबाई माझी आजी आहे. सविता माझी चुलती आहे. कृष्णानंद माझे चुलते आहे. आशाबाई माझी आई आहे. वैशाली, जयश्री व रेखा माझी बहिण आहे. निर्मला माझी आत्या आहे.

१९. हे खरे आहे की, माझ्या आजोबांच्या हिश्याला कोणकोणत्या जमिनी

आल्या हे माझ्या चुलत्यांना माहिती आहे.

प्रश्न–दिलीप आणि कृष्णानंद यांनी नि.दि.दा.क्र.५४/२०१० हा दावा दाखल केला त्यात तुम्हीही पक्षकार होता?

उत्तर– मला इतके सांगता येणार नाही. माझ्या बळजबरीने त्यांनी सह्या घेतल्या होत्या.

हे खरे आहे की, मी, माझ्या बहिणी, आई, आत्या असे सर्व दाव्यात हजर झालो होतो. मी त्यावेळेस माझा लेखी जबाब दिला नव्हता. आता मला दाखविण्यात आलेल्या कैफियतीच्या सहि शिक्याच्या नकलेवर रुख्मणबाई नामदेव शिरसाठ, सविता दिलीप शिरसाठ, कृष्णानंद नामदेव शिरसाठ, विनोद काशिनाथ शिरसाठ, आशाबाई काशिनाथ शिरसाठ, रेखाबाई अनिल जिवरग, निर्मलाबाई शिवाजी नलावडे यांची सही आहे.

२०. हे खरे आहे की, वैशाली आणि जयश्री सह्या केल्या त्यावेळेस अज्ञान होत्या म्हणून आईने सही केली होती. सदर कैफियत **निशाणी ६०** येथे आहे. हे खरे आहे की, नि.दि.दा.क्र.५४/२०१० दिलीप याने आजोबाच्या मिळकतीमध्ये वाटा मिळावा म्हणून दाखल केला होता. मला हे सांगता येणार नाही की, त्या दाव्यामध्ये प्रस्तुत दावा मिळकत समाविष्ट केली होती किंवा कसे. हे खरे आहे की, आमच्या त्या दाव्यातील कैफियतीमध्ये ही मिळकत समाविष्ट केलेली नाही. जमीन आमच्या ताब्यात होती म्हणून आम्ही समाविष्ट केली नाही.

२१. हे खरे नाही की, आमचा आजोबांच्या वंशावळी नंतर मिळकतीत संबंध नव्हता म्हणून आम्ही ती मिळकत समाविष्ट केली नाही. गट बांधणी १९७८ साली झाली. हे खरे नाही की, गट बांधणीच्या वेळेस वाद मिळकत शंकर मनाजी यांच्या नावे होती. हे खरे आहे की, आता मला दाखविण्यात आलेल्या ९/३ व ९/४ च्या उता–यामध्ये शंकर मनाजी यांच्या नावे मिळकत नोंद आहे. ते **निशाण क्र.५८** येथे आहे.

२२. मला याची माहिती नाही की, गट बांधणीच्या अनुषंगाने मिळकत नावे

झाल्याबाबत काही आक्षेप असेल तर त्याबाबत आक्षेप घ्यायला मुदत असे किंवा कसे. हे खरे आहे की, गट बांधणीच्या मागणीला कोणीही आक्षेप घेतलेला नाही. हे खरे नाही की, माझ्या दाव्यातील प्रतिज्ञापत्रातील मजकूर खोटा आहे. हे खरे नाही की, दावा मिळकतीबाबत खोटा दावा दाखल करुन खोटी केस केलेली आहे. हे खरे नाही की, दावा मिळकत आमच्या ताब्यात कधीही नव्हती व त्याचा आमचा कधीही संबंध नव्हता. हे खरे नाही की, दावा मिळकतीबाबतचे सर्व खरेदी पत्र आमच्यावर बंधनकारक नाही.

प्रश्न– खरेदी पत्र रद्द करुन मिळणेसाठी तुम्ही दावा दाखल केला का?

उत्तर– नाही.

त्र्यंबक, मनाजी आणि किसन यांच्यामध्ये वाटण्या कधी झाल्या हे मला सांगता येणार नाही. कोणाच्या हिश्याला किती मिळकत गेली हे मला सांगता येणार नाही.

**दुपारची सुटी झाल्याने उलटतपास दुपारच्या सुटीपर्यंत तहकूब**

समक्ष, श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

Digitally signed by VINAYAK DATTATRAY PATIL
Date: 2025.03.10 15:57:08 +0530

कन्नड. (वि. द. पाटील)

दिनांक : १०/०३/२०२५ दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,

02:01:37 PM कन्नड.

03:27:56 PM

**दुपारच्या सुटीनंतर पुढील उलटतपास पुढे सुरु**

२३. माझ्या म्हणण्याप्रमाणे दावा मिळकतीचे हिस्से झाले किंवा वाटण्या झाल्या याबाबत कागद दाखल केलेले नाही. नजरी नकाशा बाबत माझ्याकडे मोजणीचा नकाशा आहे. तो मोजणी नकाशा मी दाखल केलेला नाही. तो नकाशा मी दाखल करु शकतो. फेर ५८२ विरुध्द कधीही तक्रार दाखल केलेली नाही.

प्रश्न– तो फेर तुम्हाला मान्य असल्यामुळे तुम्ही तक्रार दाखल केली नाही?
उत्तर– मला त्याबाबत माहिती नव्हते.

गट बांधणीबाबत माहिती मिळाल्यावरती आम्ही त्याबाबत गट बांधणी अधिकारी यांच्याकडे दाद मागितली नाही. साक्षीदार पुन्हा सांगतो की, गेलो होतो त्यांनी आम्हाला कोर्टात जा असे सांगितले होते. मी त्याबाबतचा पुरावा दाखल करु शकत नाही. गट अधिकारी यांचे नाव माहित नसल्यामुळे त्यांना दाव्यात पक्षकार केलेले नाही.

२४. दि.०१.१२.२०१७ रोजी बेदखल केल्याबाबत पोलीस किंवा तहसिल यांच्याकडे तक्रारी अर्ज केला नव्हता. दि.२३.०१.२०१७ रोजीचे माझ्या दाव्यात नमूद पान क्र.९ दाखल केलेले आहे. हे खरे नाही की, गट क्र.१ बाबत शंकर व त्याच्या वारसांनी केलेले सर्व व्यवहार हे कायदेशीर आहे. हे खरे आहे की, गट एकत्रीकरणबाबतीत मी अद्यापपर्यंत कुठेही आक्षेप घेतलेला नाही. मयत उमाजी यांच्याकडे किती संपत्ती आहे हे मला सांगता येणार नाही. आमचे असे म्हणणे आहे की, गट एकत्रीकरणात चुक झालेली आहे. हे खरे आहे की, विहित मुदतीत आम्ही चुक दुरुस्त करुन घेतलेली नाही. हे खरे नाही की, त्यामुळे माझा दावा मुदतीत नाही. हे खरे नाही की, खोटा दावा दाखल करुन प्रतिवादी यांना निष्कारण त्रास दिला. हे खरे नाही की, प्रत्येक प्रतिवादीला २० हजार रुपये नुकसान भरपाई मिळाली पाहिजे. हे खरे नाही की, प्रतिवादीने केलेल्या सर्व खरेदी पत्र हे कायदेशीर आहे. हे खरे नाही की, खोटा दावा दाखल करुन खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

समक्ष, श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

Digitally signed by VINAYAK DATTATRAY PATIL
Date: 2025.03.10 15:57:16 +0530

कन्नड. (वि. द. पाटील)

दिनांक : १०/०३/२०२५ दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,

03:47:45 PM कन्नड.

**CERTIFICATE**

I affirm that the, contents of this P.D.F. file order are same word to word, as per the original order -

| | |
|---|---|
| Name of Stenographer | V. D. Khambat, (Grade-III) |
| Court | V. D. Patil, Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C., Kar |
| Date | 10/03/2025 |
| Order signed by the Presiding Officer | 10/03/2025 |
| Order uploaded on | 10/03/2025 |